# प्राणवायू खाटा असलेल्या रुग्णालयांचे लेखापरीक्षण

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** नाशिक येथील रुग्णालयात प्राणवायू गळती होऊन झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्राणवायू खाटा असलेल्या रुग्णालयांचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. त्याबाबतचा आदेश महापौर मुरलीधर मोहोळ यांनी महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना दिला आहे. अग्निसुरक्षा लेखापरीक्षणाच्या धर्तीवर लेखापरीक्षण करण्यात यावे आणि त्याबाबतचा अहवाल ठेवावा, असे या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

शहरातील करोनाबाधित रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राणवायूची शहरात सध्या कमतरता जाणवत आहे. शहरासाठी दररोज २५० मेट्रिक टन प्राणवायू आवश्यक आहे. त्याचा पुरेसा पुरवठा होत नसल्यामुळे अनेक खासगी रुग्णालयांनी रुग्ण घेणे बंद केले असून काही रुग्णालयांनी रुग्णांना अन्य रुग्णालयात स्थलांतरित केले आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील प्राणवायू, रेमडेसिविर औषधाचा तुटवडा, खाटांचे नियोजन यासंदर्भात महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली पक्षनेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीत नाशिक येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर चर्चा करण्यात आली. तेंव्हा महापौर मुरलीधर मोहोळ यांनी आयुक्तांना तातडीने लेखापरीक्षण करण्याचे आदेश दिले.

शहराला २५० मेट्रिक टन, तर जिल्ह्यासाठी ३८५ मेट्रिक टन प्राणवायूची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने विभागीय आयुक्त सौरभ राव यांच्याबरोबर सकाळी चर्चा करण्यात आली. प्राणवायू कसा उपलब्ध करता येईल, याबाबत पाठपुरावा सुरू आहे. रेमडेसिविर इंजेक्शनचाही तुटवडा शहरात जाणवत आहे. त्यादृष्टीने महापालिकेनेही रेमडेसिविर खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्राणवायू आणि रेमडेसिविरचा पुरवठा करण्याची जबाबदारी अन्न आणि औषध प्रशासन विभागाची आहे. त्यामुळे तातडीने प्राणवायू पुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आल्याची माहिती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

दरम्यान, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित ग्रामीण भागाला मिळून दररोज सध्या ३८५ मे.टन प्राणवायूची गरज आहे. मात्र, जिल्ह्यातील चार कंपन्यांकडून बुधवारी केवळ २९० मे.टन प्राणवायूचा पुरवठा करण्यात आला. शासकीय व खासगी रुग्णालये, करोना काळजी केंद्रांमध्ये प्राणवायूचा वापर जपून करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती अतिरिक्त जिल्हाधिकारी विजयसिंह देशमुख यांनी दिली.

# आता झळा प्राणवायू तुटवड्याच्या!

## साठा मिळवण्यासाठी रुग्णालयांचाही आटापिटा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना रुग्णसंख्येतील वाढ नियंत्रणात येण्याची चिन्हं नाहीत. त्यामुळे रुग्णालयातील खाटा, इंजेक्शने आणि औषधांपाठोपाठ आता प्राणवायूच्या तुटवड्याच्या झळा शहरातील रुग्णालयांना बसत आहेत. मागणी आणि पुरवठा यातील व्यस्त प्रमाणामुळे रुग्णालयात दाखल रुग्णांसाठी प्राणवायूचा पुरवठा सुरू ठेवण्यासाठी रुग्णालयांनाही आटापिटा करावा लागत आहे.

बुधवारी नाशिकमध्ये रुग्णालयातील प्राणवायू गळतीमुळे चोवीस रुग्णांना प्राण गमवावे लागले. मंगळवारी पुणे जिल्ह्यातील चाकण आणि हडपसर येथील खासगी रुग्णालयांतील प्राणवायू संपल्याने चार रुग्ण दगावले. त्या पार्श्वभूमीवर शहरातील प्राणवायूच्या तुटवड्याचा आढावा घेतला असता करोना व्यतिरिक्त ३६ ते ४८ तास पुरणारा प्राणवायूचा साठा अवघ्या तीन ते चार तासांमध्ये संपुष्टात येत असल्याचे समजले. अनेक वर्षे रुग्णालयांना प्राणवायू पुरवणाऱ्या यंत्रणाही हतबल असल्याने अनेकदा मागणीच्या तुलनेत कमीच प्राणवायू पुरवत असल्याची माहिती रुग्णालये देत आहेत. जे रुग्ण गृह विलगीकरणात आहेत, त्यांच्या प्रकृतीत गुंतागुंत निर्माण झाली, तर त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागत आहे. बहुतांश रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्याचे कारण प्राणवायू किंवा कृत्रिम श्वसन यंत्रणेची गरज हेच आहे. त्यामुळे दाखल रुग्णांनाच प्राणवायू पुरवणे शक्य नसेल, तर नव्या रुग्णांना कसे दाखल करून घ्यावे, असा प्रश्न रुग्णालयांसमोर आ वासून उभा आहे.

> दिवसाचे २४ तास आम्हाला प्राणवायूचे सिलिंडर आणून देणारी वाहने वितरकांकडे उभी आहेत. मिळालेला साठा किती काळ पुरेल याची शाश्वती नाही. १०० खाटांपैकी ८० खाटांना प्राणवायू आणि कृत्रिम श्वसन यंत्रणेची गरज आहे. शहरातील वाढत्या रुग्णांची गरज पाहता खाटा वाढवण्याचे नियोजन आम्ही करत होतो, मात्र प्राणवायूच्या उपलब्धतेची परिस्थिती पाहता ते शक्य नाही. जे रुग्ण दाखल आहेत, त्यांना प्राणवायू देणे आणि साठा संपत आल्यास त्यांना कोठे हलवायचे याचे नियोजन करणे हेच आव्हान आहे.
>
> – डॉ. मुकुंद पेनूरकर, वैद्यकीय संचालक, संजीवन रुग्णालय.

> रुग्णांना जिथे प्राणवायूची खाट किंवा कृत्रिम श्वसन यंत्रणा मिळेल तेथे त्यांनी दाखल व्हावे आणि ठरावीक रुग्णालयाचा आग्रह धरू नये अशी विनंती आम्ही रुग्णांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना करत आहोत. प्राणवायूची गरज आणि पुरवठा यात प्रचंड तफावत आहे. त्यामुळे परिस्थिती गंभीर आहे, असे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते.
>
> – डॉ. उमेश वैद्य, समन्वयक, भारती आयुर्वेदिक रुग्णालय.

> मागील दोन दिवस प्राणवायूच्या पुरवठ्याची चिंता होती. आज गरजेपुरता साठा उपलब्ध झाला आहे, मात्र उद्या पुन्हा साठा मिळणार का याची चिंता आहेच. रुग्णालयापर्यंत येणारे सर्वच रुग्ण प्राणवायू आणि कृत्रिम श्वासासाठी येत आहेत, त्यामुळे त्यांच्या गरजेला पुरे पडण्याचे आव्हान आहे.
>
> – डॉ. राजीव जगताप, जगताप हॉस्पिटल.

> आमच्याकडे तुटवडा नाही, मात्र रुग्णाच्या प्रकृतीचे सातत्याने निरीक्षण, त्याला दिल्या जाणाऱ्या प्राणवायूचा दाब नियंत्रित ठेवणे आणि गळती होणार नाही हे पाहणे, ही पथ्ये पाळल्यास प्राणवायूची बचत करून रुग्णाची प्रकृती स्थिर ठेवणे शक्य आहे. तसा प्रयत्न केल्यास सद्यःस्थितीवर मात करणे शक्य आहे.
>
> डॉ. कपिल झिरपे, रुबी हॉल क्लिनिक.

# कोईमतूर, विशाखापट्टणम येथून पुण्याला प्राणवायू

## पुरवठा सुरळीत होण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित ग्रामीण भागात वाढत्या रुग्णसंख्येमुळे प्राणवायू मागणी आणि पुरवठा यामध्ये तफावत निर्माण होत असल्याने टंचाई निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर कोईमतूर, विशाखापट्टणम येथून पुण्याला प्राणवायुचा पुरवठा करण्यात येणार आहे.

शहरासह जिल्ह्यातील प्राणवायूचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी प्राणवायू पुरवठा करणाऱ्या चार कंपन्यांच्या ठिकाणी चार उपआयुक्त दर्जाचे अधिकारी, तसेच रिफायनरींच्या ठिकाणी १६ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली प्राणवायूचे वितरण होणार आहे.

रेमडेसिविर इंजेक्शनच्या तुटवड्यामुळे रुग्णांचे नातेवाईक हैराण असतानाच शहरासह जिल्ह्यात प्राणवायूचा मागणीपेक्षा पुरवठा कमी झाल्याने चार रुग्णांना आपला जीव गमवावा लागला. कंपन्यांकडून रुग्णालयांना कमी प्रमाणात वितरण करण्यात आल्याने शहरासह जिल्ह्यातील अनेक रुग्णालये, करोना काळजी केंद्रांमध्ये प्राणवायूचा तुटवडा निर्माण झाला आहे. परिणामी प्राणवायू, कृत्रिम श्वसन यंत्रणेवर (व्हेंटिलेटर) असलेल्या रुग्णांना प्राणवायू पुरवठा करताना रुग्णालयांची दमछाक होत असून काही रुग्णांना प्राणवायूअभावी अन्य ठिकाणी स्थलांतरित करावे लागत आहे.

दरम्यान, रायगड जिल्ह्यात जेएसडब्ल्यू, चाकण येथील एअर लिक्विड, पुण्यात आयनॉक्स आणि टायोनिपॉन या कंपन्यांकडून शहरासह जिल्ह्याला प्राणवायू पुरवठा केला जातो. पुण्यात एकूण ११ कंपन्यांकडून प्राणवायू उत्पादन केले जाते. प्राणवायू पुनर्भरण केंद्रांची संख्या देखील वाढवण्यात आल्याचा दावा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आला.

> दररोजच्या सरासरी मागणीपेक्षा अधिक मागणी झाल्याने प्राणवायूचा तुटवडा निर्माण झाला. प्राणवायूची कमतरता भासू नये, याकरिता रायगड येथील जिंदाल कंपनीकडून अधिकचा साठा मागवण्यात आला आहे. प्राणवायू वितरण योग्य प्रकारे होण्यासाठी कंपन्या आणि रिफायनरी या ठिकाणी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्या आहेत. दोन दिवसांत ही परिस्थिती नियंत्रणात येईल.
>
> – डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी

### अधिकाऱ्यांच्या नेमणुका

पुण्यात प्राणवायूचा तुटवडा भासू नये, यासाठी कोईमतूर आणि विशाखापट्टणम येथून प्राणवायूची मागणी करण्यात येणार आहे. त्यामुळे प्राणवायुची कमतरता भासणार नाही, असा दावा विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी केला. टायो निप्पॉन सॅनगो इंडिया, लिंडे इंडिया, बेल्लारी स्टिल, आयनॉक्स एअर प्रॉडक्टस आणि एअर लिक्विड या पाच कंपन्यांमध्ये प्राणवायुची निर्मिती केली जाते. या कंपन्यांमधून प्राणवायूचा पुरवठा सुरळित राहण्यासाठी उत्तम पाटील, अस्मिता मोरे, अविनाश हदगल आणि नीलप्रसाद चव्हाण या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. या पथकाने दर दोन तासांनी प्राणवायू वितरणाबाबतची माहिती ऑनलाइन देण्याचे आदेश राव यांनी दिले आहेत.

**इंडिगो पेन्टस् लिमिटेड**
(पुर्वीची इंडिगो पेन्टस् प्रायव्हेट लिमिटेड)
सीआयएन: यु२४११४पीएन२०००पीएलसी०१४६६९
नोंदणीकृत कार्यालय: इंडिगो टॉवर, स्ट्रीट-५, पल्लोड फार्म-२, बाणेर रोड, पुणे-४११०४५, महाराष्ट्र. दूर.:+९१२०६६८१४३००
ई-मेल:secretarial@indigopaints.com, वेबसाईट:www.indigopaints.com

**सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, सिक्युरिटीज अ‍ॅण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम २९ सहवाचिता नियम ४७ नुसार खालील बाबी विचारात घेणे व मान्यता देणे याकरिता **शुक्रवार, १४ मे, २०२१** रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा होणार आहे.

१) ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीकरिता कंपनीचे अलेखापरिक्षीत वित्तीय निष्कर्ष आणि

२) ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष.

उपरोक्तसूचना कंपनीच्या www.indigopaints.com आणि कंपनीचे शेअर्स जेथे सुचिबद्ध आहेत त्या नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

ठिकाण: पुणे
दिनांक: २१ एप्रिल, २०२१

इंडिगो पेन्टस् लिमिटेड करिता
सही/-
सुजॉय सुदीप्ता बोस
कंपनी सचिव व सक्षम अधिकारी

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**शिवाजीनगर विभाग वीज बंद निवेदन**

म.रा.वि.वि. कंपनीच्या शिवाजीनगर विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ग्राहकांना सूचित करण्यात येते की, कंपनीच्या अत्यंत महत्वाच्या व तातडीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांकरीता खालील भागातील वीज पुरवठा **गुरुवार दिनांक २२/०४/२०२१ रोजी सकाळी १०:०० ते १६:००** या कालावधीत बंद राहणार आहे.
**११ केव्ही बॉम्बे–पुणे फिडर–** मेहता डि.टी.सी., आर.सी. रोड, नेहरू गार्डन्स, फॅक्टरी गेट., **११ केव्ही खडकी बाजार फिडर –** खडकी बाजार, निता अपार्टमेंट, शेवाळे टॉवर, बिझनेस सेंटर, **११ केव्ही मिल्क डेअरी फिडर –** बॉम्बे पुणे रोड, पि.एम.सी. कॉलनी, प्रतिभा, कल्पतरू, स्टेट बँक, मिल्क डेअरी, डेर्शल उद्योग, एस.टी.स्टॅंड,प्रित चेंबर. **११ केव्ही माय फेअर फिडर –** एम.पी.जे.चेंबर, स्फुर्ती सोसा.,माय फेअर टॉवर, वोडाफोन, **११ केव्ही ओ.एच.२ फिडर –** मॉडेल कॉलनी, लकाकी रोड, हारे कृष्णा मंदिर रोड, गोखले रोड, **११ केव्ही आशा नगर फिडर –** शिवसृष्टी वैदुवाडी, बहिरटवाडी, शिवाजी हौसिंग सोसा., **२२ केव्ही प्राज फिडर –** रामनगर कॉलनी, एन.डी.ए. रोडचा काही भाग, कात्रज–देहुरोड बायपासचा काही भाग, बावधनचा काही भाग.
तत्पूर्वी देखभाल व दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यास वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येईल.

कार्यकारी अभियंता
PRO No. : PZ 11/21 शिवाजीनगर विभाग,म.रा.वि.वि.कं.मर्या.,पुणे.

**PUBLIC NOTICE**

The property described in the schedule herein below is owned and possessed by **Mrs. Manasi Gunesh Sose and Mr. Prakash Dnyneshwar Nagare.** The said Mr. Prakash Dnyneshwar Nagare has entered into the Development Agreement with Mrs. Vinita Sandeep Jagadhane for area admeasuring 9.75 Are i.e. 975 sq. mtrs. Thus, in the total area admeasuring 00 Hector 39 Ares i.e. 3900 sq. mtrs. Area admeasuring total 9.75 Ares i.e. 975 sq. mtrs. undivided is owned by Mr. Prakash Dnyaneshwar Nagare and the development rights in respect of this area are with Mrs. Vinita Sandeep Jagadhane. The remaining area i.e. 29.25 Ares i.e. 2925 sq. mtrs. undivided is owned by Mrs. Manasi Gunesh Sose. My clients are negotiating with the said owners and Mrs. Vinita Sandeep Jagadhane for purchasing the said property and the said Owners and the Developer have represented to my client that their title in respect of the said property is free, clear and marketable beyond reasonable doubt and that the said property is free from all encumbrances and charges. In order to investigate the title of the said owners as well as developer in respect of the said property and to seek information about any third parties whomsoever, other than the said owners above named having any legal rights titles or interest in the said property or any legal objection intended to the said transaction of the said property between the said owners and my client. Hence all concerned are hereby informed to notify the undersigned in writing about any of their lawful claims, alleged or otherwise, or demands against the said owners in respect of the said property or objections to the intended transaction, within **10 (Ten) days** of the issuance hereof along with copies of original documents in support of such claims or demands, failing which my client will proceed with the intended transaction with the said owners presuming that the said owners are absolutely entitled as owners to the said property and entitled to sell/ transfer the same to my client, free from all encumbrances and all such alleged or other claims/ demands of any such third parties have been deliberately and will fully abandoned or waived by them and no such claims will be entertained thereafter which please note.

**SCHEDULE OF THE SAID PROPERTY**

All that piece and parcel of a land bearing S.No. 53, Hissa No. 5, admeasuring 00 Hectare 39 Ares, falling under the Residential zone which is situated at Revenue Village Bavdhan Khurd, Taluka Mulshi, District Pune, within the jurisdiction of Sub-Registrar Haveli and within limits local limits of Pune Municipal Corporation, the boundaries of which are as follows :- On or towards the East: 18 meters D.P. Road,On or towards the South: By land bearing S. No. 53 Hissa No. 6,On or towards the West: By lands bearing S. No. 53 Hissa No. 2 & 4.On or towards the North: By lands bearing S. No. 53 Hissa No. 3.

Pune, Date : 21/04/2021
**Anurag Nevse, Advocate**
9, Tirupati Complex, Opp. K.E.M. Hospital, Rasta Peth, Pune 411011.
Email : anurag16.mandar@gmail.com Mob No. +91 9762850607

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८**
**मध्यवर्ती भांडार विभाग**
**अल्प मुदतीची जाहिर सूचना क्रमांक - ०१/२०२१-२२**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवीन भोसरी, थेरगाव, आकुर्डी, व नवीन जिजामाता रुग्णालयामध्ये कोवीड-१९ - या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर तातडीने आयसीयू सुरू व इतर बेड्स करणेसाठी उपकरणे/साहित्य खरेदीकामी उत्पादित कंपनी अथवा उत्पादित कंपनी विक्रते / वितरक यांचेकडून दरपत्रक मागविणेत येत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | अंदाजे किंमत | बयाणा र. रु. | अनामत र. रु. | फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | कोवीड-१९ - या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर तातडीने आयसीयू सुरू व इतर बेड्स करणेसाठी उपकरणे/साहित्य खरेदी सोबतच्या शेड्युल/स्पेसिफिकेशन प्रमाणे करणेबाबत | १,९३,२३,७९०/- | १९३२३८/- | ९,६६,१९०/- | २५७६०/- | ३० टक्के उपकरणे/साहित्य २ दिवसाच्या मुदतीत व ७० टक्के उपकरणे/ साहित्य ७ दिवसाच्या मुदतीत |

सदर जाहिर सूचनेतील पुरवठ्याचा तपशील, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटी–शर्ती शेड्युल इत्यादीची माहिती मनपाच्या **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर उपकरणे/साहित्य खरेदीसाठी दोन लिफाफा पद्धतीने दर मागविण्यात येत आहेत. इच्छुक दरपत्रकधारकांनी त्यांचे दरपत्रक लिफाफा पद्धतीने सादर करावयाचे आहे.
सदरची अल्प मुदतीची जाहीर सूचना दिनांक- १९/०४/२०२१ ते दिनांक २२/०४/२०२१ अखेर सकाळी ११.०० वाजेपर्यंत मध्यवर्ती भांडार विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ येथे समक्ष बंद लिफाफ्यात करावयाची आहे.
कोणतेही कारण न देता दरपत्रक पूर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार आयुक्त सो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे- ४११०१८ यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

जाहिरात क्र. – ८२७
क्रमांक– मभां/१७/कावि/१५३ /२०२१
दिनांक – १९/०४/२०२१

सही/
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपलिका
पिंपरी-४११०१८

**नोटीस**

भारतीय स्टेट बँक, आरएसीपीसी-२, प्रिया निवास, साई मंदिर पाठीमागे, साई नगर मावळ, गहुंजे, पुणे-४१२१०१.

नोटीस देण्यात येते कि, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल आसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ (२००२ चा ५४) च्या कलम १३ (१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ३ आणि ९ अन्वये प्राप्त अधिकारात खाली नमूद केलेल्या कर्जदाराचे समोर दर्शविलेल्या तारखांना मागणी नोटीस पाठवून मागणी नोटीस मिळाल्या तारखेपासून ६० दिवसाचे आत बँकेस देणे असलेली संपूर्ण रक्कम भरण्याची मागणी केलेली होती.
कर्जदार / जामीनदार मागणी केल्याप्रमाणे भरणा करण्यास असमर्थ ठरले आहेत. सर्वसाधारण जनता व विशेष करून कर्जदार / जामीनदार यांना हि जाहीर नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) व सदर नियम क्र. ९ अन्वये खाली नमूद केलेल्या तारखांना तारण मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे. सर्वसाधारण जनता व विशेष करून कर्जदार / जामीनदार यांना सावधान करण्यात येते कि त्यांनी सदर मिळकतीसंबंधात कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करू नये, असा व्यवहार केल्यास तो भारतीय स्टेट बँकेच्या व्याजासह येणे रकमेच्या बोजासह असेल. कर्जदाराचे ध्यान सदर कायद्याच्या कलम १३, उपकलम ८ कडे आकर्षित करण्यात येत असून त्यात कर्जदारास आपल्या तारण मिळकतीवरील बोजा उतरवून घेण्यास उपलब्ध असलेल्या कालमर्यादेची तरतूद आहे.

| क्र. | कर्जदाराचे नाव व पत्ता | अचल मालमत्तेचा तपशिल | मागणी नोटीस तारीख | खाते थकवाकीत गेलेली तारीख | थकवाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | सौ.स्नेहल राजेंद्रप्रसाद लाहोरे (कर्जदार) श्री. राजेंद्रप्रसाद शिवप्रसाद लाहोरे (जामीनदार) फ्लॅट नं. १०४, पहिला मजला, बालाजी रेसिडेन्सी, विनायक नगर, लेन नं. २, काटेपुरम चौक, पिंपळेगुरव, पुणे-४११०६१. मुख्य शाखा- गहुंजे खाते क्र. ३७६७३८२३१८५ गृहकर्ज | फ्लॅट नं. १०४, पहिला मजला, बालाजी रेसिडेन्सी, विनायक नगर, लेन नं. २, काटेपुरम चौक, पिंपळेगुरव, पुणे-४११०६१. १ बी एच के, पहिला मजला, क्षेत्रफळ ५९.८२ चौ.मी. अधिक १३.८८ चौ. मी. ची लगतची टेरेस. प्रोजेक्ट्च्या करारानुसार मालमत्तेच्या चतु:सिमा पूर्वेस : श्री. मल्लेरामची मालमत्ता पश्चिमेस : रोड उत्तरेस : श्री. रामगोपाल नायडूची मालमत्ता दक्षिणेस : सत्यम अपार्टमेंट | ०८.०४.२०२१ | ३०.११.२०२० | रू. ६३,०७,२१५/– (त्रेसष्ठ लाख सात हजार दोनशे पंधरा फक्त) |

दिनांक : १६/०४/२०२१
ठिकाण : पुणे

सही
अधिकृत अधिकारी,
भारतीय स्टेट बँक, आरएसीपीसी – २

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११०१८.**
**--- निविदा क्र.०७/२०२१-२०२२ ---**

निगडी दापोडी रस्ता (जुना पुणे मुंबई महामार्ग) येथे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व मोटर विरहीत वाहतुकीच्या अनुषंगाने सर्वसमावेशक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी व सुशोभीकरण करण्यासाठी पात्र संस्थांकडून Expression Of Interest मागविण्यात येत आहेत.

**Expression of Interest**

शहरे वाहतुकीच्या दृष्टीने परिवर्तनाच्या मार्गावर आहेत. शहरीकरण व नागरीकरण यामुळे विविध सार्वजनिक वाहतूक पर्याय निवडणे आवश्यक झालेले आहेत. त्यादृष्टीने सकारात्मक नियोजन करणे आवश्यक आहे. जगातील बहुतेक शहरे वाहतूक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहेत.
नजीकच्या काळामध्ये सार्वजनिक वाहतूक, मोटर विरहित वाहतूक व सर्वसमावेशक पायाभूत उभारणे सुविधा उभारणे कायद्याने बंधनकारक झालेले आहे त्या अनुषंगाने समाजातील सर्वांना घटकांना विना अडथळा प्रवास करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे बंधनकारक आहे. त्यायोगे सर्वांना समान संधी उपलब्ध होऊन त्यांना देशाचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये सहभागी होण्यास मदत होईल.
उपरोक्त नमूद रस्ता कामाचे सोयीच्या दृष्टीने दोन भागांमध्ये विभागलेला आहे. भाग १ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हॅरीस पुल दापोडी, लांबी ६.६ किलोमीटर, भाग २ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी ते भक्ती शक्ती चौक निगडी, लांबी ५.४ किलोमीटर.
सर्व पात्र इच्छुक निविदाकारांनी त्यांचे प्रस्ताव उपरोक्त नमूद Expression Of Interest च्या अनुषंगाने सादर करावयाचे आहेत. सदरचा प्रस्ताव मनपाद्वारे गठीत समितीद्वारे तपासण्यात येऊन निवडण्यात आलेल्या निविदाकारास कामाचे आदेश देण्यात येतील. या कामासाठी महापालिकेतील प्रचलित दारांचे मर्यादेमध्ये फी अदा करण्यात येईल. यासाठी शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/प्र/क्र/५४/ नवी, १६ दिनांक ४ जून २०१८ आधारभूत असेल. अधिक तपशील जाणून घेण्यासाठी **www.mahatenders.gov.in** व **www.pcmcindia.gov.in** या वेबसाईटवर संपर्क साधावा.

जाहिरात क्र. ८३२
क्र.स्था/नि/BRTS/३७२/२०२१
दि.२०/०४/२०२१

सही/–
(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११०१८

**accelya**
**Accelya Solutions India Limited**
Registered Office : "Accelya Enclave", 685/2B & 2C, 1st Floor, Sharada Arcade, Satara Road, Pune - 411 037 Tel : +91-20-66083777 Fax : +91-20-24231639
Email : accelyaindia.investors@accelya.com Website : https://w3.accelya.com
CIN : L74140PN1986PLC041033

**NOTICE**

Notice is hereby given, pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of SEBI (Listing Obligations And Disclosure Requirements) Regulations, 2015 that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Friday, 30th day of April, 2021, to consider, inter alia the unaudited (standalone & consolidated) financial results for the quarter and nine months ended 31st March, 2021.

For further details, please visit the website of the Company (https://w3.accelya.com) or that of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).

For Accelya Solutions India Ltd.
Sd/-
Ninad Umranikar
Company Secretary

Place : Pune
Date : 21/04/2021

*Advanced Computing for Human Advancement*
सी-डैक CDAC

Centre for Development of Advanced Computing (C-DAC), a Scientific Society under Ministry of Electronics and Information Technology (MeitY) invites online applications for the following positions.

**A. Scientific & Technical**

| Pay Level | Position | No. of Posts | Initial Posting | Reservation Details |
|---|---|---|---|---|
| 11 | Sr. Technical Officer | 02 | Silchar | UR 2 |
| 10 | Technical Officer | 02 | | ST 1 EWS 1 |

**B. Non Scientific & Technical**

| Pay Level | Position | No. of Posts | Initial Posting | Reservation Details |
|---|---|---|---|---|
| 12 | Manager (Admin)/ (Purchase) | 03 | Pune | UR 1 SC 1 EWS 1 |
| 10 | Finance Officer | 03 | Kolkata Patna Silchar | UR 2 SC 2 ST 1 OBC 1 EWS 1 |
| | Purchase Officer | 02 | Patna Trivandrum | |
| | Admin Officer | 02 | Kolkata Patna | |

**How to Apply:** Interested candidates may visit "careers" page of www.cdac.in for detailed notification and apply online on or before 09th May, 2021-1800 hrs.

**Note:** Addendum/further communications in this regard, if any will be notified in the C-DAC's website only.

Corporate Office: C-DAC Innovation Park 34, B/1, Panchawati, Pashan, Pune, 411008
ADVT.NO.CORP/GR.A/02/2021 - Director (HRD)

EXPRESS Careers

**DATTAKALA SHIKSHAN SANSTHA**
At Gat No.541/2, Off Pune-Solapur Highway, Swami- Chincholi (Bhigwan), Tal- Daund, Dist- Pune - 413130
Email: dkcom.edu@rediffmail.com. Call: 9820233397, 9075680865

**Recruitment - For COVID Centre**

Applications are invited for COVID centre at above mentioned address for the following posts.

| Name of Post | No. of Post | Name of Post | No. of Post |
|---|---|---|---|
| 1) MD Medicine | 03 | 5) Administrative Officer | 01 |
| 2) BAMS (Residential) | 02 | 6) Receptionist | 03 |
| 3) Staff Nurse | 15 | 7) Accountant | 01 |
| 4) PRO | 01 | 8) Data Entry Operator | 01 |

NOTE: 1) No TA/DA will be paid for attending the interview.
2) Qualification and pay scale will be as per the norms.
3) Latest Application with Qualification and Experience document with color passport size photo should send within 8 days on above email id.

Dr. Vishal Babar — Dr. Rahul Palshetkar

**Chetana's**
**Institute of Management & Research**
*AICTE New Delhi Approved & ISO 21001 : 2018 Certified*

Celebrating **25** years of Excellence in Management Education conducting AICTE approved PGDM Programmes invites applications for the post of:

**DIRECTOR**

**Academic Qualifications:** PhD degree and First class or equivalent at either Bachelor's or Master's level in the relevant branch
**Experience** : Minimum 15 years of experience in teaching/research/ industry of which minimum of 3 years as a Professor.
**Research** : Minimum 8 publications in SCI/UGC/AICTE approved journal & successfully guided 2 PhD candidates as supervisor /co-supervisor. (Please refer **www.aicte-india.org** / AICTE Notification dated 1st March 2019.)

Interested eligible candidate may download the prescribed format from **www.cimr.in** and send it along with the detailed CV on recruitments@cimr.in or post/courier it (which should reach us within 15 days of the date of this advertisement) addressed to:

**The Secretary, Chetana Trust, Survey No. 341, Govt. Colony, Bandra (E), Mumbai 400051.**
**Phone Nos.:** 022 62157801 / 02 / 03